**समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात शिफारशी करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बैठक-२०२४/प्र. क्र. ९०/एसडी-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०४ मार्च २०२५.

वाचा:-

शासन निर्णय, समक्रमांक, दि. २२.०८.२०२४ व दि. १४.१०.२०२४.

प्रस्तावना:-

सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी सन २०००-२००१ पासून देशभरात झाली. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १८.१.२००२ च्या शासन निर्णयान्वये सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी राज्यात करण्याचा निर्णय घेण्यात आला व सदर अभियानाच्या अंमलबजावणीची जबाबदारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे सोपविण्यात आली. सदर संस्था ही "सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० व मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये पंजीकृत करण्यात आली आहे.

२. केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या योजनांचे एकत्रिकरण करून सन २०१८-१९ पासून केंद्रीय योजना समग्र शिक्षा योजना अंमलात आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील शिफारशींच्या अनुषंगाने समग्र शिक्षा योजनेची पुनर्रचना करण्यात आली आहे. सदर योजनेचे केंद्र आणि राज्य हिस्स्याचे प्रमाण ६०:४० असे आहे.

३. सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणीच्या दृष्टीने मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेल्या मॅन्युअल ऑन फायनान्शिअल मॅनेजमेंट ॲन्ड प्रोक्युअरमेंट २००४ मधील नियम ३७ (मॅनेजमेंट कॉस्ट) अन्वये सर्व शिक्षा अभियानांतर्गत पदांना मंजूरी देताना नवीन पदनिर्मिती करू नये तसेच निर्माण केलेली पदे केवळ कंत्राटी अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात यावीत. सदर पदे भरल्यामुळे सोसायटी अथवा राज्य शासनावर कायमस्वरूपी दायित्व येता कामा नये, असे नमूद केले आहे.

४. मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या उपरोक्त नमूद मार्गदर्शक सूचनांच्या आधारे प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सेवा नियमावली, १९९४ नुसार व्यवस्थापनांतर्गत मंजूर असलेल्या पदांपैकी काही पदे प्रतिनियुक्तीने तर काही पदे करार/कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली आहेत. सदर पदे कंत्राटी / प्रतिनियुक्तीने भरतांना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सेवा नियमावली, १९९४ मध्ये नमूद केलेल्या विहित प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच नमूद कार्यपद्धतीनुसार करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या सेवा, दर सहा महिन्यांनी एक दिवसाचा खंड देऊन सुरू ठेवण्यात आल्या आहेत. सदर कंत्राटी कर्मचा-यांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या एकक दराने मानधन अनुज्ञेय आहे.

५. समग्र शिक्षा योजनेंतर्गत कार्यरत करार कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२.७.२०२४ रोजी सह्याद्री अतिथिगृह येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी या कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी समिती गठीत करण्याचे निर्देश दिलेले होते. त्यानुसार, समिती गठीत करण्याबाबतचा दि.२२.०८.२०२४

रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करून शासन निर्णय दि.१४.१०.२०२४ अन्वये समितीची पुर्नरचना करण्यात आलेली आहे. सदर समितीचे पुनर्विलोकन करून समितीमध्ये प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा “सदस्य” म्हणून समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

संदर्भाधिन दि.१४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयाचे पुनर्विलोकन करून समग्र शिक्षा योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या करार कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीची पुनर्रचना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष |
| २. | मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ३. | मा. श्री. किशोर दराडे, विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| ४. | मा. श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, विधान परिषद सदस्य | सदस्य |
| ५. | मा. श्री. ज. मो. अभ्यंकर, विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| ६. | मा. श्रीमती मनिषा कायंदे, माजी विधान परिषद सदस्य | सदस्य |
| ७. | आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ८. | राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई. | सदस्य सचिव |
| ९. | सह सचिव/ उप सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| १०. | सह सचिव/ उप सचिव (वि. वि.) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | सदस्य |
| ११. | उप सचिव (विधी)/ विधी सल्लागार, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | सदस्य |
| १२. | श्री. मनोहर धोंडे, करार कर्मचारी संघटना यांचे प्रतिनिधी क्र. १ | सदस्य |
| १३. | श्री. प्रकाश आंबेकर, करार कर्मचारी संघटना यांचे प्रतिनिधी क्र. २ | सदस्य |

२. सदर समितीने या करार कर्मचाऱ्यांच्या शासन सेवेत समायोजन व अन्य प्रश्नाबाबत अन्य राज्यांमध्ये या योजनेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या करार कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मानधन व अन्य सेवाशर्ती याबाबत अभ्यास करून शासनास तीन महिन्याच्या आत अहवाल सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३०४१८११०२५६२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMDAS GANPAT DHUMAL

Digitally signed by RAMDAS GANPAT DHUMAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=3246a8286e67ae7423b98bfd800865585eb8601521f097ab07142d65ea9b2b15, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=24F4ACDDCFF993441F6C634862546E9D122E0DB556806B179B794879ACF360F5, cn=RAMDAS GANPAT DHUMAL
Date: 2025.03.05 10:14:36 +05'30'

**(रामदास धुमाळ)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, सर्व.
४. मा.विधानसभा/विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई (सर्व).
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०. आयुक्त, महानगरपालिका, सर्व.
११. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. शिक्षण संचालक (निरंतर), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७. संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
१८. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
१९. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.
२०. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
२१. विभागीय शिक्षण उप संचालक, सर्व.
२२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर), जिल्हा परिषद, सर्व.
२३. मुख्याधिकारी, नगरपालिका/नगर परिषद, सर्व.
२४. संबंधीत कंत्राटी कर्मचारी संघटना यांचे प्रतिनिधी.
२५. निवडनस्ती (एसडी-१).